ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

REVIEW OF RESEARCH

# साहित्य आणि सामाजिक बांधिलकी



डॉ. हेमंत म. देशमुख
आठवले समाजकार्य महाविद्यालय, भंडारा

---

## प्रस्तावना

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. साहित्यामधून समाजजीवनाचे प्रतिबिंब पडत असते. साहित्य आणि समाज यांचे रक्तमासाचे नाते असते. कारण कोणतेही साहित्य हे आकाशातून पडत नसून ते समाजाच्या भूमिकेतूनच उगवत असते. पाश्चात्य विचारवंत पॉल क्ले यांनी असे म्हटले आहे की, ''एखादया वृक्षाचा संबंध जसा जमिनीशी असतो वरवर पाहता त्या वृक्षाचा संबंध जमिनीशी दिसत नसला तरी त्या वृक्षाची वाढ जमिनीशिवाय होणे शक्य नाही. जमिनीतील मिळणाऱ्या सेंद्रिय द्रव्यातून त्या वृक्षाची उंचउंच वाढ होत असते तसेच कोणत्याही साहित्याचे आहे.'' अशाप्रकारे साहित्य आणि समाजाचा जन्यजनक संबंध असतो.

बांधिलकीचा विचार खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये आपल्याकडे साहित्यामधून पहावयास मिळतो. विशेषकरून आंबेडकरी क्रांतीविचाराच्या विरोधात बांधिलकीला विरोध सुरू झाला. मराठी साहित्यक्षेत्री वरिल संघर्षात अपयशी होऊ लागलेले मन बांधिलकीला विरोध करीत असल्याचे दृश्य दिसते.

पश्चिमी समाजात परस्परविरोधी जीवनसरणींच्या संघर्षामधूनच बांधिलकीचा विचार धारदार झाला. ''राष्ट्रवाद, उदारमतवाद, साम्यवाद, समाजवाद, फॅसिझम'' यासारख्या मतप्रणालीला अनुसरून समाजातील सर्वच शक्तीने कार्य करावे असा आग्रह धरण्यात येऊ लागला. त्यातूनच ललितकला आणि साहित्याची निर्मिती होऊ लागली.

२० व्या शतकाच्या तिसऱ्या दशकापासून वैचारिक मतप्रणालीमध्ये धृवीकरण होऊन घडून स्वतंत्र लोकशाही समाज व बंदिस्त सर्वकष सत्तेखालील समाज असा दोन गटामध्ये पश्चिमी जग विभागल्या गेले. यातूनच साहित्यिक कलावंतांच्या बांधिलकीचा विचार तीव्रतर होत गेला. आंबेडकरी चळवळीमुळे आपल्याकडे हे घडले आणि बांधिलकीचा विचार अधिक तीव्र होत गेला. हजारो वर्षे गुलाम राहिलेल्या व सर्जनशीलतेशी नाते तुटलेला मोठा समाज प्रचलित सामाजसंस्था बदलून टाकण्यासाठी 'विद्रोह' झाला. मनुष्याला गुलाम करणाऱ्या मूल्यांविरुद्ध विद्रोह आणि मनुष्याला सुंदर व समर्थ करणाऱ्या मूल्यांशी बांधिलकी हे आंबेडकरवादी साहित्याचे जन्ममूल्य झाले. ही बांधिलकी दलितांच्या स्वातंत्र्योपासनेचा भाग होती. यापूर्वी त्याने धर्माच्या परंपराच्या आज्ञा वंदनीय मानल्या पण ही बांधिलकी म्हणजे त्याने केलेली गुलमगिरीची पूजाच होय.

जो साहित्यिक पुरोगामी असतो तोच बांधिलकी मानत असतो आणि प्रतिगामी साहित्यिक बांधिलकी मानीत नसतो अशी समजूत साहित्यामध्ये पसरली असते. त्यामुळे परंपरावादी मूल्यांशी चिकटून असलेले साहित्यिक बांधिलकीचा मुद्दा उपस्थित करून पुरोगामी साहित्यिकांची हेटाळणी करीत असतात. बांधिलकी संबंधीची ही समजूत अत्यंत वरवरची असून एकांगी आहे. खरेतर बांधिलकी मानणारे आणि बांधिलकी न मानणारे असे समाजामध्ये वर्ग नसतातच. बांधिलकी म्हणजे साहित्यिकाची जीवनदृष्टीच होय. एका विशिष्ट मूल्यदृष्टिने साहित्यिकाची प्रतिभा संपादित होत असते. ही मूल्यदृष्टी त्याच्या व्यक्तित्त्वाचे आणि वाङ्मयीन व्यवहाराचे नियंत्रण करीत असते. जन्म ही जशी अटळ बाब आहे तशी बांधिलकीही व्यक्तिला टाळता येत नाही. साहित्यिकांमध्ये बांधिलकी

मानणारे आणि बांधिलकी न मानणारे हे वर्ग नसतात तर बांधिलकी मानणाऱ्या या सर्वच साहित्यिकांचे 'जैसे थे'वादाशी बांधिलकी आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, व बुद्धिप्रामाण्य या जीवनसरणीशी बांधिलकी असे मूल्यविग्रहाच्या पातळीवरचे दोन वर्ग पडत असतात. बांधिलकीधारकांना काही साहित्यिक किंवा समीक्षक विरोध करीत असतात, पण हा विरोध त्यांच्या मनातील कोणत्यातरी मूल्यांच्या संदर्भात बांधिलकीमूळेच शक्य होतो. एका बांधिलकीच्या विरोधाचा आधार दुसरी कुठलीतरी बांधिलकी हाच असतो.

साहित्याची जीवनाशी बांधिलकी असतेच. जीवनातील व्यवहारांच्या सामग्रीशिवाय ललित साहित्य संभवू शकत नाही. साहित्यकृतीचा आशय हा नानाविध जीवनव्यवहार व साहित्यिकांचे मन यांच्या संवादा—विसंवादातून साकार होत असते. जीवनाच्या आकलनाला अनुभवाच्या आशय—आकृतीला साहित्यिकाच्या मूल्यदृष्टीचे रंग प्राप्त होत असतात. ही मूल्यदृष्टीच चांगले—वाईट ठरवित असते. साहित्यातील सौंदर्याचीही निश्चिती करते प्रत्यक्ष जीवनातील 'जैसे थे' वादी बांधिलकी साहित्यव्यवहारात अलौकिकवाद या नावाने वावरते तर प्रत्यक्ष जीवनातील समताकांक्षी बांधिलकी साहित्यव्यवहारात अलौकिकतावाद या नावाने वावरते. अलौकिकतावादही जीवनवादच असतो. लौकिकतावादही जीवनवाद असतो. आपण कोणताही वाद पत्कारला तरी मुद्दा काहींचे हीत की सर्वांचे हीत एवढाच असतो.

प्रत्येक मनुष्य समाजातील कोणत्या ना कोणत्या संस्कारशाळेतच सिद्ध होत असतो. या संस्कारांना मूल्यांचे अधिष्ठान असते. कोणतेच संस्कार झाले नाहीत, कोणत्याच श्रद्धा मानत नाहीत, कोणत्याही मूल्यव्यवस्थेशी मनाचे कल जोडता येत नाहीत. अशी व्यक्ती, अशी मानसिकता जगात प्रकृतिताच अशक्य आहे. कशाचा तरी अंगिकार, कशाला तरी नकार अशीच व्यक्तिच्या व्यक्तित्वची मूस असतो. ही मूस म्हणजे मूल्यभाव होय. या मूल्यभावातूनच लेख अनुभवाचे आकलन करीत असतो. घोषणा, उपदेश, बोध, निष्कर्ष या पातळीवरून हा मूल्यभाव कलेतून व्यक्त होत असतो. व्यवस्थापूजक मूल्यभाव ज्याच्या कला—सहीत भिनलेला असतो असा एक लेखकवर्ग असतो आणि व्यवस्थाभंजक मूल्यभाव ज्यांच्या लेखनात भिनलेला असतो असा दुसरा लेखकवर्ग असतो. पहिला लेखकवर्ग गतकालीन विषमतापूजक मूल्यभाव मांडत असतो. व्यक्तिवाद, पूनरूज्जीवनवाद, पूर्वजगौरव या चिपळूणकरी मार्गदशनाखाली आपला कलाप्रबंध सिद्ध करीत असतो. समकालीन बंधमुक्तिच्या प्रक्रियेत तो सहभागी होऊ शकत नाही. तांबे, फडके, मर्ढेकर, गदिमा, गो.नि. दांडेकर, जी.ए. कुळकणी असे लेखक या वर्गात येत असतात.

लेखकाचा दूसरा वर्ग हा वरील व्यवस्थापूजकांच्या जाणिवा तुडवित असतो. तो गतिचा कायदा पाळीत असतो. तो थांबत नसतो, संपत नसतो. इतरांना संपवित थांबवित नसतो. समाज सौंदर्याच्या निर्मितीप्रक्रियेत तो मनानेच सामिल झालेला असतो. केशवसुत, हरिभाऊ, वरेरकर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, मुक्तिबोध, बागूल, सुर्वे हे या वर्गाचे प्रतिनिधी असतात.

बांधिकीचा मुद्दा खोलात जाऊन तपासावा लागतो. बांधिलकी वरवर बघता एखाद्या महापुरुषाशी, संप्रदायाशी, वादाशी दिसली तरी त्यांच्याद्वारा ती व्यवस्थेच्या मार्गदर्शक तत्वांशी असते. वरिलपैकी कोणत्याही एका गटातील दृश्यादृश्य बांधिलकी नसते असा लेखक संभवत नसतो. बांधिलकीचा मुद्दा तपशिलाशी जोडून प्रस्थापित टीकाकार किंवा कलावंत प्रश्नाला विकृत करून टाकतात. दिशाभूल करतात.

वाङ्‌मयीन कलाकृती भोवतीच्या सांस्कृतिक, आर्थिक, वाङ्‌मयीन, नैतिक आणि सामाजिक संदर्भाताच साकार होत असते. या सर्वांचा प्रत्यक्षा प्रत्यक्ष परिणाम वाङ्‌मयकृतीत मुखरित होत असतो.. साहित्य हे समाजजीवनाचे महत्वाचे अंग आहे आणि इतर अंगाशी त्याचे अंगभूत नाते असतेच. साहित्याचे विश्व हे त्यामुळेच अंगभूत ठरत असते आणि त्याचा आस्वाद सुद्धा मूल्यगर्भ ठरत असतो. कलावादी किंवा अलोकीकवादी समीक्षकही कलाकृतीतील आशयाचीच चौकशी करीत असतात आणि साहित्यकृतीला जीवनापासून तोडता येत नाही.

सुमारे १९६०—६५ नंतरच्या काळात सामाजिक बांधिलकीचा प्रश्न मराठी साहित्य विश्वामध्ये प्रामुख्याने चर्चिल्या गेला. त्याकाळी दलित साहित्यातील विद्रोहाच्या अनुषंगाने बांधिलकीच्या विरोधात वादळ उठले. या वादळामागे एका बाजून वाङ्‌मयातील कलावादी व दुसऱ्या बाजूने जीवनातील छुपी परंपरावादी वृत्ती काम करीत आहे. वास्तविक बांधिलकी मानीत नाही असा लेखकच संभवू शकत नाही. हरिभाऊ, वामन मल्हार, मर्ढेकर ही मंडळी बांधिलकी मानीत नव्हती? संतांना सामाजिक बांधिलकी नव्हती. 'जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत' या कवीतेचा कवी सामाजिक बांधिलकी मानत नव्हता? परिवर्तनवादी सामाजिक बांधिलकीचा तर पहिला निकराचा उच्चार केशवसुतांनीच मांडला! साहित्यामध्ये बांधिलकीच न मानणारा एखादा लेखक दाखवावा. ते कदापिही शक्य नाही. आंबेडकरवादी साहित्याने मार्क्सवादी साहित्याने परिवर्तनवादी साहित्याशी बांधिलकी सांगताच परंपरावादी साहित्यिकांना भय वाटायला लागले.

माणसाची स्वत:च्या व्यक्तित्वाशी बांधिलकी असतेच आणि ही बांधिलकी कलानिर्मिती करणाऱ्या माणसाच्याद्वारा सामाजिक बांधिलकी पर्यंत जाऊन भिडत असते. काहींची बांधिलकी मुख्यार्थप्रधान तर काहींची लक्ष्यार्थप्रधान तर काहींची व्यंगार्थप्रधान असते.

परंतु बांधिलकी नसणे ही अशक्यप्राय असते. बांधिलकी लपविण्याची गरज प्रतिगाम्यांना असते. सामाजिक बांधिलकी लादलेली असणे वेगळे आणि मनाने मान्य असणे वेगळे । परंतु एवढे मात्र खरे की प्रत्येकाच्या मनामध्ये कोणत्या ना कोणत्या विचारांची बांधिलकी असतेच असते!

कोणालाही काहीही करण्याचे स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचाराचे स्वातंत्र्य असे स्वैराचाराचे स्वातंत्र्य कोणतीही लोकशाही देऊ शकत नाही. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांच्या विरोधी जाऊन स्वातंर्त्याला 'स्वातंत्र्य' असता येणार नाही. तसे स्वातंत्र्य परिवर्तनाचा, समतादर्शी मूल्यांचा आणि लोकशाहीचाही बळी घेऊ शकेल. उलट ''स्वातंत्र्य, समता, बंधुत्व अशा ध्येयाकडे झेपावणाऱ्या काही कलावंताची प्रतिभा विचारामुळे बंधनात पडण्याऐवजी मुक्त होते व विशाल जीवनाचा प्रत्यय वाचकाला देऊ शकते.'' आणि लोकाशाहीचा आधार घेऊन कोणाही प्रतिगाम्याला विषमतेचा पुरस्कार करण्याचे स्वातंत्र्य मिळविता येणार नाही. समतादर्शी बांधिलकीला विरोध करणाऱ्या मराठीतील परंपरावादी साहित्यिकांना मात्र हे विषमतेच्या पुरस्काराचे स्वातंत्र हवे आहे. याचा अर्थ काय?

कलावंत हा जीवनाचा डोळस व चोखंदळ अभ्यासक असतो. समाजजीवनाचा एक अत्यंत जागरूक आणि संवेदनाक्षम घटक असल्याने तो या जीवनव्यवहारात मनाने अधिकच उत्कटपणे समावि  ट असतो. कलाकृतीच्या मूल्यदर्शित्वाचा समग्र आधार या त्याच्या गोवणूकीशी निगडीत असतो. ही गोवणूकच कलावंताच्या कलेला हृदय आणि दिशा देते. या गोवणूकीच्या उजेडातच जीवनाच्या स्थितीगतीचा तो रडार किरणाप्रमाणे वेध घेतो. याप्रकारे कलावंताच्या चिकित्सक आणि मूल्यप्रेरित अंत:करणाची अंत:साक्ष म्हणजे कला. त्याच्या डोळस अंत:करणाची मूल्यवंत स्वाक्षरी आणि त्यांच्या प्रामाणिकपणाची प्रतिज्ञोत्तरे म्हणजे त्याची कला. कलावंताचे मन तटस्थाचे मन नसते. समाज जर परिवर्तनवादी आणि परिवर्तनविरोधी यांच्यातील संघर्षाची युद्धभूमी आहे तर कलावंताचे मन ठोकळमानाचे वरील दोनपैकी कुठल्यातरी एका छावणीच्या कक्षेत येणेही अटळच आहे.

कलावंत 'हि' बांधिलकी मानणारा असला काय किंवा 'ती' बांधिलकी मानणारा असला काय; तो त्या त्या संदर्भात स्वप्रत्ययप्रामाण्यवादी असतोच असतो. आणि कुठलाही कलावंत असला तरी जीवनात त्याच्या काही विसाव्याच्या जागा असतात. काही शोकस्थळे असतात. त्यांच्या सौंदर्यबुद्धीला जायबंदी करणारी काही कुरूप स्थळे असतात. काही कलावंताच्या विसाव्याच्या जागा वेगळया, काहींच्या वेगळ्या. काहींची शोकस्थळे वेगळी, काहींची वेगळी. काही कलावंतांच्या सौंदर्यबुद्धीला खुपणारी कुरूपस्थळे वेगळी तर काहींच्यासाठी ही कुरूपस्थळे वेगळी असतात. या वेगवेगळेपणाचा संबंधच कलावंताच्या बांधिलकीशी पोचत असतो. या विसाव्याच्या जागा, ही शोकस्थळे आणि कुरूपेच कलावंतांच्या बांधिलकीचे स्वरूप निश्चित करीत असतात. अशी प्रत्येकच कलावंताची एकेक बांधिलकी, असते. कलावंत 'ठेविले अनंते'वादी असो की सडत न एक्या ठायी ठाका' वादी असो, परिवर्तनविरोधी असो की मूल्यदर्शी परिवर्तनवादी असो प्रत्येक कलावंताला आपली अशी एकेक बांधिलकी असतेच. अशी बांधिलकी नाही असा कलावंत अप्राप्य आहे आणि कुठलीतरी सामाजिक प्रेरणा दृश्यादृश्यरूपात वागवीत नाही अशी साहित्यकृती अशक्य आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :

१. मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप, गो.म. कुळकर्णी यांचे भाषण, संपा. पवार, हातकणंगलेकर, मुंबई, १९८६.
२. साहित्य आणि सामाजिक संदर्भ, रा.ग. जाधव, पूणे, १९७५.
३. बांधिलकीचे सामाजिक संदर्भ, भालचंद्र नेमाडे, केसरी दैनिकाची पूरवणी, ६ फेब्रु. १९८२.
४. दलित साहित्य चिंतन, यशवंत मनोहर, संघमित्रा बुक हाऊस, नागपूर, १९८८.